NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०२.११.२०२६ सोमवार

(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ०१.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २९ केसेसमध्ये २९ ईसमावर कारवाई करून एकुण ३०,८४५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून एकुण ३,६३०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे, दिनांक ०१.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०२.११.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०९ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ४० केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४० केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ९५ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २१२ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ९० केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ४९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १० केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १४९ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०३ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ३० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये २१ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,००६ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये २८ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २६ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,०९३ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ४,६३,९५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाची कामगीरी :– घरफोडीचा गुन्हा उघडकीस.

दिनांक २२.१०.२०२६ चे १३.३० वा. ते दिनांक २६.१०.२०२६ चे १६.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत प्लॉट नं. ४, सुरेंद्र नगर, एसबीआय बॅंकजवळ, नागपूर येथे राहणारे फिर्यादी डॉ. अतुल केशवराव कापसे, वय ४० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह भुवनेश्वर (ओडीसा) येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २५,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने, कॅमेरा, घड्याळ, ॲपल कंपनीचा लॅपटॉप चार्जर असा एकुण किंमती ७,१६,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा घरफोडी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून गुन्ह्यातील आरोपीस निष्पन्न केले. गुन्ह्यात समाविष्ट एक विधीसंघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा त्याचा साथीदार आरोपी नामे करण खेमचंद मेश्राम, वय १९ वर्षे, रा. लष्करीबाग, गली क्र. ८, तक्षशिला बुध्द विहार जवळ, पाचपावली, नागपूर याचेसह संगणमताने केल्याची कबुली दिल्याने, आरोपीस ताब्यात घेण्यात आले. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक याचे ताब्यातुन सोन्याचे वेगवेगळे दागिने वजनी २९६.०७ ग्राम तसेच, चांदीचे वेगवेगळे दागिने वजनी ६२४.९३ ग्राम असा एकुण किंमती ४२,७९,९९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालक यास मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव बजाजनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दिलीप चंदन, सपोनि. नितीन चुलपार, सफौ. नितीन तिवारी, पोहवा. प्रशांत गभने, गणेश बरडे, पोअं. पकंज निकम, अमन राऊत व चापोअं. सुधिर पवार यांनी सायबर सेलचे पोउपनि. विवेक झिंगरे व त्यांचे टिमचे विशेष सहकार्याने केली.





<u>२) एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसम धुमाकूळ घालतांना अटक.</u>

दिनांक ०१.११.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, शुभम नगर, झेंडा चौकाजवळील सार्वजनिक ठिकाणी, पांढरी हॉफ टि—शर्ट व काळा पॅन्ट घातलेला एक इसम रत्याने येणाऱ्या—जाणाऱ्या लोकांना शिवीगाळी करुन, धुमाकूळ घालत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम शिवीगाळ करतांना व जखमी अवस्थेत दिसुन आला. त्यास ताब्यात घेऊन, पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव निलेश उर्फ गजनी शिलानाथ शाह, वय २८ वर्षे, रा. राजीव नगर वस्ती, शुभम नगर, एमआयडीसी, नागपुर असे सांगीतले. त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२५ दिनांक २४.०४.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धुमाकुळ

घालतांना समक्ष जखमी अवस्थेत मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीची वैद्यकीय तपासणी करुन, अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री ऋषिकेश सिंगारेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १), मा. श्री. यशवंत नलावडे, सहा. पोलीस आयुक्त (एमआयडीसी विभाग), वपोनि. गोकुळ महाजन यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. गजानन काठेवाडे, पोहवा. दीपक ठाकुर, पकंज मिश्रा, ईस्माईल नौरंगाबादे व पोअं. विवेक झाडे यांनी केली.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे कळमणा :–शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक ०१.११.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना गुलशन नगर, काश्मिरी शाळेजवळील महेंद्र सोनकुसरे यांचे घरासमोर एक इसम हातात तलवार घेऊन, येणारे–जाणारे लोकांना शिवीगाळ करुन, धुमाकूळ घालतांना दिसुन आला. त्यास हटकले असता, तो पोलीसांना पाहुन शस्त्रासह पळु लागला. त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी तलवार काढुन, त्यास नि:शस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रवि राजकुमार निमजे, वय ३९ वर्षे, रा. काश्मिरी शाळेजवळ, बबलु ठाकरेचे घरी किरायाने, गुलशन नगर, कळमणा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी तलवार किंमती ५००/–रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार घेवुन धुमाकूळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. विशाल भैसारे यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. सौरभ बुनगे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे कोराडी :– चोरीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक.

फिर्यादी निलेश शालिकराम दुधबर्वे, वय ५० वर्षे, रा. केटीपीएस कॉलनी, बिल्डींग क्र. ६/१७/२, कोराडी, नागपूर हे एमएसईबी कोराडी येथील २१० मेगावॅट सेक्शन येथे कनिष्ठ अधिकारी, सुरक्षा जेएसओ म्हणुन कार्यरत आहेत. दिनांक ०१.११.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, त्यांचे दोन सुरक्षारक्षक हे आपले सेक्शनला पेट्रोलींग ड्युटी करीत असता, त्यांना दोन इसम पॅनेल बोर्डला लागलेल्या तांब्याच्या दोन प्लेट किंमती ११,२००/–रू. चा मुद्येमाल चोरी करतांना दिसुन आले. सुरक्षारक्षकांनी दोन्ही चोरांना ताब्यात घेऊन, पोलीसांना माहिती दिली. कोराडी पोलीसांनी त्वरीत घटनास्थळी भेट देऊन, दोन्ही चोरट्यांना ताब्यात घेऊन, त्यांची विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचे नावे १) नरेंद्र कमलसिंग विश्वकर्मा, वय २७ वर्षे, २) प्रमोद दिनेश सुर्यवंशी, वय २८ वर्षे, दोन्ही रा. वार्ड क्र. २, सिल्लेवाडा, खापरखेडा, जि. नागपूर असे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन संपुर्ण मुद्येमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे पोउपनि. क्रांती पवार ८६००९७५६६६ यांनी दोन्ही आरोपींविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करुन, त्यांना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे पाचपावली :– सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ३१.१०.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, फिर्यादी यांचा भाऊ नामे गोलु कैलाश शेवारे, वय ३३ वर्षे, रा. पंचशील नगर, सारीपुत्र बुध्द विहाराजवळ, पाचपावली, नागपूर हा त्याचे वस्तीतील रंजीत सहारे

याचे घराजवळ उभा असता, तेथे आरोपी नामे अक्षय उर्फ भेंड्या राजेश बोदेले, वय २१ वर्षे, रा. पंचशील नगर, सारीपुत्र बुध्द विहाराजवळ, पाचपावली याने कोणत्यातरी कारणावरुन फिर्यादीचे भावाचा जिव जाऊ शकतो असे माहिती असतांनाही त्याचेवर चाकुने वार करुन गंभीर जखमी केले. फिर्यादीचा भाऊ जखमी यास उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे दाखल केले असुन, त्याचेवर उपचार सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी बाळु कैलाश शेवारे, वय ३३ वर्षे, रा. वरीलप्रमाणे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे सपोनि. गजानन अंसापुरे ९१३००५२०६२ यांनी आरोपीविरूध्द कलम ११० भा.न्या. सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.